डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/ठेकामजूर/413/२०२३ दिनांक :— 10 MAR 2023

**जाहीर नोटीस**

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील विविध विभागातील निर्धारीत कामे ठेका पध्द्तीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. **०१/०४/२०२३** ते दि. **३०/०६/२०२३** या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २४.०३.२०२३** पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ — या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | ट्रॅक्टरने नागंरणी करून रोटाव्हेटर मारणे, शेणखत व माती ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून प्रक्षेत्रावर आणणे, भात, नागली, भुईमुग, आंबा बाटा तसेच इतर पिकांची पेरणी करणे. प्रक्षेत्रावरील लागवड करावयाच्या प्लॉटची बांधबदिस्ती/साफसफाई करणे, तसेच अनुषंगिक खरिपपुर्व कामे कामे करणे. | ०३ |
| ०३ | प्रक्षेत्र | भात, नागली, भुईमुग, आंबा बाटा पेरणीसाठी गादी वाफे तयार करणे, काजु बी गोळा करणे, तसेच ती धुवून वाळविणे व पॅकींग करणे, प्रक्षेत्रावर उत्पादीत विविध बियाणे वाळविणे, काजु बी रूजत घालणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे/रोपे इ. ना पाणी घालणे, पीक संरक्षक औषधे/संजीवके इ. ची फवारणी/आळवणी करणे, फूट काढणे, बेणणी करणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०२ |
| ०५ | नर्सरी | आंबा, काजू कलमांसाठी पिशव्यांत पॉटींग मिश्रण भरणे, पिशव्या शेडमध्ये लावणे, काजु कलमे बांधणी करीता मातृवृक्ष बागेमधील झाडांवर डिफॉलीएशन करणे, कलमकाडया काढणे, काजु कलमे बांधणे. तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०३ |
| | | **एकूण** | **१४** |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :—**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२.३० व दु. ०२ ते ०५.३० )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा. ( सका. ९.०० ते ०१.३० व दु. ०२ ते ०५.३० )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

(signature)
कार्यक्रम समन्वयक,
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,
ता. लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :—**

१. मा. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना विनंती करण्यात येते की, सदर जाहीर नोटीस चा मसुदा विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द् करून मिळावा.

२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली

/— सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात यावे ही विनंती.